## <u>नि.दि.मु.क्र.७०/२०१७ मधील निशाणी क्र.४४ वरील आदेश</u>

## <u>(**CNR No. MHSI**080007912017)</u>

०१. प्रस्तूत अर्जान्वये वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.०५ मधुकर सोनू वरवडेकर यांचे कायदेशीर वारस मुदतीत रेकॉर्डवर न आणल्याने प्रतिवादी क्र.०५ विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होऊन मिळणेकरीता विनंती केली आहे. वादी यांचे कथनानुसार, सदर दाव्याचे कामी प्रतिवादी क्र.०५ हे दि.१४/०९/२०२१ रोजी मयत झाले आहेत. परंतू सन २०२१ मध्ये कोरोना महामारीमुळे शासनातर्फे लॉकडाऊन घोषित करण्यात आले होते. सदर कालावधीत तातडीची कामे वगळता अन्य न्यायालयीन कामकाज बंद होते. वादी क्र.१ हे वयोवृध्द असून त्यांना रक्तदाब व मधुमेह सारखे आजार असल्याने ते पुणे येथे उपचार घेतात. सदर कारणामुळे प्रतिवादी क्र.५ चे वारस रेकॉर्डवर आणणेस विलंब झाला आहे. त्यामुळे प्रस्तूत दावा प्रतिवादी क्र.०५ विरुध्द अबेट झाला आहे. सबब, प्रस्तूत प्रतिवादी क्र.०५ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करुन मिळणेबाबत वादी यांनी विनंती केली आहे.

०२. प्रतिवादी क्र.१ यांनी सदर अर्जावर आपले म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रस्तूत अर्ज व विलंबाचे कारण खोटे व खोडसाळ आहे. प्रतिवादी क्र.५ हे वादीचे सख्खे भाऊ आहेत. सबब, वादीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०३. अर्ज व त्यावरील जबाब तसेच, उभय पक्षाच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता अर्जात नमुद कारणे ही योग्य असल्याचे दिसून

येते. प्रस्तूत दावा हक्कस्थापना, आज्ञार्थी ताकिद व नुकसान भरपाई मिळणेकरीता दाखल केला आहे. प्रस्तूत प्रतिवादीचे वारस हे दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत. परीणामी, दाव्याचे स्वरुप लक्षात घेता, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे योग्य वाटते. करीता, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

– **आदेश –**

१. निशाणी क्र.४४ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.०५ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश न्यायपुर्ततेकरीता रद्द करण्यात येत आहे.

SHAIEKH TAJJUM SHAIEKH HAMID
Digitally signed by SHAIEKH TAJJUM SHAIEKH HAMID
Date: 2024.03.15 17:39:52 +0530

स्थळ : कणकवली
(टी.एच.शेख)

दिनांक : १५/०३/२०२४
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कणकवली.